# महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

''उद्योग सारथी'', मरोळ औद्योगिक क्षेत्र, महाकाली गुंफा मार्ग, अंधेरी (पूर्व), मुंबई-९३.

क्र. मऔविम/भूविभाग/म.व्य.(भूमी)/ — /A93260 दिनांक :- 11/03/2020

## कार्यालयीन आदेश

**विषय :- उद्योग विस्ताराकरीता भूखंड वाटप करण्याकरीता अवलंबवायाची कार्यपध्दती..**

**संदर्भ :-**
**१. क मऔविम/विधी व कामकाज विभाग/१५३/२०१२ दि. २७.०४.२०१२**
**२. क्र. मऔविम/भूविभाग/कार्यासन-१/८४६० दि. ०७.०१.२०१३**
**३. क्र. मऔविम/भूविभाग/सी९४४४८ दि. २८.०२.२०१९**
**४. क्र. मऔविम/म.व्य(भूमी)/बी८८१३५ दि.०७.०६.२०१९**
**५. क्र. मऔविम/म.व्य.(भूमी)/बी८८१४७ दि. ०७.०६.२०१९**
**६. क्र. मऔविम/भूविभगा/म.व्य.(भूमी)/डी०४७३३ दि. १३.०९.२०१९**

उद्योग विस्तारासाठी भूखंड वाटप करण्याकरीता महामंडळाने उपरोक्त संदर्भिय क्र. ६ अन्वय भूखंड वाटप समितीव्दारे अवलंबविण्यात येणा-या कार्यपध्दतीबाबत सूचना निर्गमित केल्या असून त्यानुसार उद्योग विस्तारासाठी भूखंड वाटप करताना ऑनलाईन सरळ पध्दतीने प्रत्येक १ तारखेला जाहिरात प्रसिध्द करुन अर्ज मागविण्याचे निर्देश असून त्यानुसार दिनांक १३.०९.२०१९ रोजी पासून कार्यवाही करण्यात येत आहे.

सदरहू परिपत्रकानुसार, काही उद्योग विस्ताराची प्रकरणे दिनांक १३.०९.२०१९ पूर्वीचे असून अशा प्रकरणात भूखंड वाटप समितीचे अभिप्राय प्राप्त झालेले आहेत परंतु सदरहू धोरणानुसार त्यांचा प्रस्ताव भूखंड वाटप समितीसमोर न ठेवता त्यांना १३.०९.२०१९ च्या परिपत्रकानुसार कार्यवाही होणेबाबत कळविण्यात आलेले आहे. काही उद्योजकांनी मुळ भूखंडाचा विकास ६० टक्क्यापेक्षा अधिक केला असून त्यांची नवीन गुंतवणूक मोठया प्रमाणात असून त्यांना उद्योग विस्तारासाठी त्वरीत भूखंड आवश्यकता आहे.

तसेच काही उद्योजकांच्या विनंतीनुसार तसेच मा. मु.का.अ. यांचे मंजूरीने MMC मध्ये भूखंडांचे रुपांतरीत करण्यात आलेले आहे. काही भूखंड Land lock आहेत सदरहू भूखंडांचा इतर उद्योजकांस उपयोग नाही किंवा मागणी प्राप्त होणार नाही त्यामुळे अशा उद्योजकांकडून भूखंड वाटपाबाबत महामंडळाकडे विचारणा होत आहे.

सबब, सदरहू गोष्टींचा विचार करता, प्रकरणी दिनांक १३.०९.२०१९ च्या परिपत्रकामध्ये सुधारणा करुन खालील नमूद प्रकरणात **प्राधान्य सदराखाली ऑनलाईन सरळपध्दतीने नियमित अर्ज** मागवून भूखंड वाटप करण्यात यावे.

१. A](अ) भूखंडधारकाने मूळ भूखंडावर ६० टक्के चटई निर्देशकांपेक्षा जास्त वापर केला आहे तसेच (ब) भूखंडावरील बीसीसी ६० टक्क्यापेक्षा कमी व ४० टक्क्यापेक्षा जास्त आहे. सदरहू उद्योजकास त्यांच्या प्रकल्पानुसार मोकळी जागा जास्त प्रमाणात ठेवणे आवश्यक आहे. तसेच सदरहू उद्योजकांचे प्रस्तावित भूखंडाचे **क्षेत्र १०,००० चौ.मी. व त्यापेक्षा जास्त आहे**, अशा भूखंडावरील गुंतवणूक खालीलप्रमाणे असणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | प्रभाग(zone) व क्षेत्र वर्गीकरण | कमीत कमी गुंतवणूक (रु. कोटी मध्ये) (Working Capital वगळून) |
|---|---|---|
| १ | अ | १०० कोटी |
| २ | ब | ६० कोटी |
| ३ | क | ४० कोटी |
| ४ | ड व ड+ | २० कोटी |

१. B](अ) भूखंडधारकाने मूळ भूखंडावर ६० टक्के चटई निर्देशकांपेक्षा जास्त वापर केला आहे तसेच (ब) भूखंडावरील बीसीसी ६० टक्क्यापेक्षा कमी व ४० टक्क्यापेक्षा जास्त आहे. सदरहू उद्योजकास त्यांच्या प्रकल्पानुसार मोकळी जागा जास्त प्रमाणात ठेवणे आवश्यक आहे. तसेच सदरहू उद्योजकांचे प्रस्तावित भूखंडाचे क्षेत्र **५,००० चौ.मी. व त्यापेक्षा जास्त व १०००० चौ.मी. पेक्षा कमी आहे**, अशा भूखंडावरील गुंतवणूक खालीलप्रमाणे असणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | प्रभाग(zone) व क्षेत्र वर्गीकरण | कमीत कमी गुंतवणूक (रु. कोटी मध्ये) (Working Capital वगळून) |
|---|---|---|
| १ | अ | ५० कोटी |
| २ | ब | ३० कोटी |
| ३ | क | २० कोटी |
| ४ | ड व ड+ | १० कोटी |

१. C](अ) भूखंडधारकाने मूळ भूखंडावर ६० टक्के चटई निर्देशकांपेक्षा जास्त वापर केला आहे तसेच (ब) भूखंडावरील बीसीसी ६० टक्क्यापेक्षा कमी व ४० टक्क्यापेक्षा जास्त आहे. सदरहू उद्योजकास त्यांच्या प्रकल्पानुसार मोकळी जागा जास्त प्रमाणात ठेवणे आवश्यक आहे. तसेच सदरहू उद्योजकांचे प्रस्तावित भूखंडाचे **क्षेत्र ५,००० चौ.मी. पेक्षा कमी आहे**, अशा भूखंडावरील गुंतवणूक खालीलप्रमाणे असणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | प्रभाग(zone) व क्षेत्र वर्गीकरण | कमीत कमी गुंतवणूक (रु. कोटी मध्ये) (Working Capital वगळून) |
|---|---|---|
| १ | अ | २५ कोटी |
| २ | ब | १५ कोटी |
| ३ | क | १० कोटी |
| ४ | ड व ड+ | ५ कोटी |

२. ज्या प्रकरणात भूखंडधारकाच्या विनंतीनुसार दिनांक १३.०९.२०१९ पूर्वी भूखंडाचे MMC मध्ये औद्योगिक भूखंडात रुपांतर करणेबाबत निर्णय झालेला आहे.

३. भूखंडधारकाने मागणी केलेला क्षेत्र हे Land Lock आहे, जे इतर कोणालाही वाटप करता येणार नाही. याबाबत संबंधित कार्यकारी अभियंता/उप अभियंता/सर्व्हेअर यांचा वस्तुस्थितीदर्शक अहवाल घेण्यात यावा. सदर Landlock क्षेत्राबाबत मुद्या क्र. १(A)(B)(C) मध्ये दर्शविण्यात आलेली गुंतवणूकीपेक्षा कमी गुंतवणूक असली तरी सदर भूखंड इतरांना वाटप करता येणार नसल्याने मुद्या क्र. १(A)(B)(C) मधील गुंतवणूक लक्षात घेण्यात येवू नये.

४. दिनांक १३.०९.२०१९ पूर्वीच्या भूखंड वाटप समितीच्या बैठकीमध्ये NGT/MPCB चे Consent अप्राप्त असल्याने पुढे ढकलण्यात(Defer) आलेली प्रकरणे.

५. वरील पैकी मुद्या क्र. १ (A)(B)(C) अंतर्गत येणा-या प्रकरणांसाठी भू-वाटप समितीसमोर सादर करण्यापूर्वी मा. मु.का.अ. यांची पूर्व परवानगी घेण्यात यावी.

६. सदरहू प्रकरणी संदर्भिय परिपत्रकान्वये निर्गमित केलेल्या इतर अटी व शर्ती लागू राहतील

सर्व संबंधितांनी उपरोक्त नमूद प्रमाणे काटेकोरपणे कार्यवाही करण्यात यावी व उपरोक्त दिलेल्या अधिकारानुसार अंमलबजावणी करण्यात यावी.

**(अविनाश सुभेदार)**
**सह मुख्य कार्यकारी अधिकारी**
**मऔविम, मुबई**

प्रत माहितीस्तव तथा पुढील कार्यवाहीसाठी :-

१. सर्व विभाग प्रमुख, मऔविम, मुंबई.
२. अतिरिक्त मुख्य अभियंता, मऔविम, पुणे/नांदेड/नागपूर.
३. सर्व अधिक्षक अभियंता, मऔविम.
४. सर्व प्रादेशिक अधिकारी, मऔविम.
५. सर्व कार्यकारी अभियंता, मऔविम.
६. सह मुख्य/उप मुख्य लेखा अधिकारी, मऔविम, मुंबई/पुणे /औरंगाबाद/नागपूर.
७. महाव्यवस्थापक (भूमि)/महाव्यवस्थापक (भूसंपादन)/व्यवस्थापक (भूमि-१/२), मऔविम, मुंबई.
८. प्रशासकीय अधिकारी, मऔविम, मुंबई.

९. व्यवस्थापक (भूसंपादन-१/२), मऔविम, मुंबई.
१०. जनसंपर्क अधिकारी, मऔविम, मुंबई.
११. सर्व क्षेत्र व्यवस्थापक, मऔविम.
१२. म.औ.वि. महामंडळाचे सर्व संचालक.
१३. सर्व महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र.
१४. सर्व औद्योगिक संघटना.
१५. मुख्य मध्यवर्ती परिपत्रक नस्ती/मुख्य कार्यकारी अधिकारी, मऔविम, कार्यालय मरोळ/जागतिक व्यापार केंद्र (डब्ल्यू.टी.सी.), कफ परेड, मुंबई